# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
" उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक
क्षेत्र, अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०० ०९३
दुरध्वनी क्रमांक - ०२२ - ४७४८४६७९/४७४८४६९९/४७४८८३१२

---

जा.क्र.मऔविम/साप्रवि/स.से.भ./ पी - २०३०४१ /२०२४ दिनांक : १३/०३/२०२४

## सरळसेवा भरती २०२३ - सुचनापत्र

**विषय** : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील सरळसेवा भरती - २०२३ अंतर्गत परीक्षेचे वेळापत्रक प्रसिध्द करणेबाबत..

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सरळसेवा भरती - २०२३ अंतर्गत ३४ संवर्गातील ८०२ पदांसाठी दि.१४/०८/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द केलेली असून दि.०२/०९/२०२३ ते दि. २५/०९/२०२३ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, सरळसेवा भरती - २०२३ मधील खालील पदांच्या परीक्षा या परीक्षा घेणा-या संस्थेच्या **अधिकृत केंद्रांवर** खालील दिनांकास घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेसाठी समान शैक्षणिक पात्रता असलेल्या पदांचे खालीलप्रमाणे गट तयार करण्यात आलेले असून सदर गटामधील पदांसाठीच्या परीक्षेचा दिनांक त्या-त्या गटासमोर नमुद केलेला आहे.

| गट | पद | ऑनलाईन परीक्षा दिनांक |
|---|---|---|
| १. | लघुलेखक (उच्च श्रेणी) गट - क | ३० मार्च २०२४ |
| | लघुलेखक (निम्न श्रेणी) गट - क | |
| | लघुटंकलेखक गट - क | |
| २. | कनिष्ठ अभियंता (विवयां) गट - क | २ एप्रिल २०२४ |
| ३. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) गट - अ | ३ एप्रिल २०२४ |
| | उप अभियंता (स्थापत्य) गट - अ | |
| ४. | लेखा अधिकारी गट - ब | ३ एप्रिल २०२४ |
| | वरीष्ठ लेखापाल गट - क | |
| ५. | सहयोगी रचनाकार गट - अ | ३ एप्रिल २०२४ |
| | उप रचनाकार गट - अ | |
| | सहायक रचनाकार गट - ब | |

सदर तक्त्यामध्ये नमूद केलेल्या पदांसाठीच्या परीक्षेचे नियोजन केलेले असून त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. ज्या उमेदवारांनी, एका गटातील एका पेक्षा जास्त पदांसाठी अर्ज सादर केलेले आहेत, त्या पदांसाठीची एकच परीक्षा घेण्यात येणार आहे याची सर्व उमदेवारांनी नोंद घ्यावी.

२. परीक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) महामंडळाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र लिंकद्वारे परीक्षेपुर्वी किमान ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. संबंधित उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरुन त्यांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) डाऊनलोड करुन घ्यावीत. ऑनलाईन परीक्षा या परीक्षा घेणा-या संस्थेच्या **अधिकृत केंद्रांवरच** घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी निवडलेले परीक्षा केंद्रच मिळेल याची हमी देता येणार नाही.

३. स्पर्धा परीक्षेचे ठिकाण व वेळ या बाबी, स्पर्धा परीक्षा घेण्यात येणा-या संस्थेने उमेदवारांना दिलेल्या परीक्षेच्या प्रवेशपत्रावर (Hall Ticket) नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे, संबधीत उमेदवाराने त्या - त्या परीक्षा केंद्रावर वेळेपूर्वी हजर राहणे अनिवार्य राहील.

४. सदर पदभरतीकरीता परीक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांनी परीक्षा घेणा-या संस्थेमार्फत त्यांना उपलब्ध करुन देण्यात येणा-या प्रवेशपत्रामध्ये व माहितीपुस्तकात नमुद केलेल्या सुचनांचे काळजीपुर्वक वाचन करुन त्याचे तंतोतंत पालन करावे व परीक्षा केंद्रावर वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन परीक्षार्थींना करण्यात येत आहे.

५. उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केलेल्या पदांच्या व्यतिरिक्त उर्वरीत पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेबाबत स्वतंत्रपणे सुचनापत्र निर्गमित करण्यात येईल.

स्वाक्षरीत

दिनांक : १३/०३/२०२४

ठिकाण : मुंबई

(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ